MHKO180000532012

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.१३३/२०१२ मधील</u>**
**<u>निशाणी क्र.१६३ खालील आदेश.</u>**
**<u>(सागर कोळी व इतर वि. सागर आंबी व इतर.)</u>**

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादींच्या कथनानुसार, प्रस्तुत दावा प्रलंबीत असतेवेळी प्रतिवादींनी त्यांची कैफियत दुरुस्ती करण्याकरीता निशाणी क्र.१५४ वर दाखल केलेला अर्ज मंजूर करण्यात आला असून प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये केलेल्या दुरुस्तीमुळे त्या अनुषंगाने वादींना दावा दुरुस्तीकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तावित दावा दुरुस्ती ही दाव्याचा गुणानुगूणावर निकाल लावण्याकरीता अत्यंत महत्वाची आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादींच्या विद्यमान वकीलांनी केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांनी निशाणी क्र.१७० वर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील मजकूर मान्य व कबूल नसल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांनी वैकल्पीकरित्या असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रस्तुतचा अर्ज वीस हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करण्यात यावा.

०४. प्रतिवादी क्र.२ व प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ यांनी अनुक्रमे निशाणी क्र.१७१ व १७३ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जातील मजकूर मान्य व कबूल नसल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.२ व प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ यांनी वैकल्पीकरित्या असे कथन केले आहे की, प्रस्तुत अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रस्तुतचा अर्ज पाच हजार रुपये इतक्या खर्चासह मंजूर करण्यात यावा. प्रस्तावित प्रतिवादी क्र.३ यांनी निशाणी क्र.१७९ वर पुरसीस दाखल करुन

प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ यांनी प्रस्तुत अर्जावर दाखल केलेले म्हणणे हेच त्यांचे म्हणणे म्हणून वाचण्यात यावे, असे कथन केले आहे.

०५.	दावा, कैफीयत, प्रस्तुत अर्ज, त्यावरील प्रतिवादी क्र.२ व ३ आणि प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ ते ६ यांनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. उभयपक्षाच्या विद्यमान वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दावा प्रलंबीत असतेवेळी प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांनी निशाणी क्र.१५४ वर दाखल केलेला कैफियत दुरुस्तीसाठीचा अर्ज मंजूर करण्यात आल्यामुळे त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता वादींना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. दाव्यामधील प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचा गुणानुगूणावर निकाल लावण्याकरीता महत्वपूर्ण असल्याचे दिसून येत आहे. तसेच, वादींना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. तसेच, प्रस्तुत अर्ज मंजुर केल्यास वाद विषयाचे संपूर्ण निराकरण होण्यास मदत होणार असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, वरील सर्व बाबींचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. तसेच, प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांनी त्यांच्या कैफियतीमध्ये दुरुस्ती केल्यामुळे वादींना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले असल्यामुळे प्रस्तुत अर्जासंबंधी उभयपक्षांनी आपआपला खर्च सोसण्याबाबत आदेशीत करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये नमुद दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्ती प्रत प्रस्तुत प्रकरणात दाखल करावी. तसेच दुरुस्ती दाव्याची प्रत्येकी एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. उभयपक्षांनी प्रस्तुत अर्जावरील आपआपला खर्च सोसावा.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.04.25 18:25:46 +0530

दिनांक : २४.०४.२०२५ (बाळासाहेब श्री. गायकवाड)
कुरुंदवाड. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुरुंदवाड.